क्रमांक :पोअय/ वि.चौ./कक्ष १२(१)/अं.आ/पोहेका ५९५/ 8019 /२०
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड: ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 29 OCT 2020

## अंतीम आदेश

**संदर्भ -** का.दा.नो.क्र.वाचक/कादानो/पोहेका ५९५/ २०२०/६८४ यवतमाळ दि.१६/४/२०२०

**कसूरदाराचे नाव - पोहेका / ५९५ भालचंद्र मांडवकर नेमणुक- पो.स्टे. मारेगाव**

**थोडक्यात कसूरी :- कर्तव्यात अत्यंत हलगर्जीपणा,निष्काळजीपणा,बेपर्वावृत्ती की,ज्यात तुम्ही खालील प्रमाणे कसुरी केली आहे.**

---oo---

**तुम्ही पोहेका / ५९५ भालचंद्र मांडवकर नेमणुक- पो.स्टे. मारेगाव येथे कार्यरत असुन तुम्ही खालीलप्रमाणे कसुरी केल्याचे दिसुन येते.**

----ooo---

तुम्ही पो.स्टे.मारेगाव येथे नेमणुकीस असुन पो.स्टे.मारेगाव येथील अप.क्र.२९४/१९ मधील अटक आरोपी मंगेश बनकर रा.वरोरा जि.चंद्रपुर यास न्यायालयात हजर करण्याअगोदर आरोपी यांचेकडील जमा असलेली ४५००/- रुपयाची रक्कम स्वता:जवळ घेवुन आरोपीस कोणतीही पावती दिली नाही.

तुम्ही आरोपीचे अंगझडतीत मिळुन आलेले ४५०० रु.त्याचे नातेवाईकांना देवुन त्याबाबत स्टेशन डायरीला नोंद घेणे आवश्यक होते. किंवा सदरची रक्कम पो.स्टे.ला जमा करुन तशी पावती आरोपीस देणे हे तुमचे कर्तव्य असतांना सुध्दा तुम्ही सदरची रक्कम स्वत:जवळ ठेवुन घेतली. त्यामुळे आरोपी यांचे नातेवाईकांनी वि. न्यायालयात याबाबत तक्रार केली होती.

सदर बाब ही न्यायाधिश साहेब यांनी प्रभारी अधिकारी यांना भेटी दरम्यान निर्दशनास आणुन दिली होती .तत्पुर्वी कोर्ट मोहरर पोका/९८२ प्रमोद फुपरे यांनी त्याच दिवशी प्रभारी अधिकारी यांना कळविले वरुन प्रभारी अधिकारी यांनी तुम्हास वेळीच कळवुन आरोपी यांची रक्कम परत करण्याबाबत कळविले असता आरोपी जामीनावर सुटल्यानंतर स्वत:जवळची जमा रक्कम तुम्ही त्यास परत केली.

सदर रक्कम हेतुपुरस्पर स्वत:चे फायद्याकरीता जवळ बाळगुन कर्तव्यात कसुर केला आहे.तुमचे गैरशिस्त वर्तनामुळे जनमानसात पोलीसांची प्रतीमा मलीन झाली आहे.

अशा प्रकारे तुमचे हे कृत्य पोलीस खात्यास अशोभनिय व अत्यंत गंभीर स्वरुपाचे आहे.यावरुन तुम्ही बेजबाबदारपणा,गैरशिस्त वर्तनाचे, पोलीस खात्याची विश्वासर्हतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी,तसेच आक्षेपार्ह करीत असल्याचे निदर्शनास येते.त्यामुळे जनसामान्यामध्ये पोलीस दलाची बदनामी झाली.शिस्तबध्द अशा पोलीस खात्यात

जबाबदार पदावर कार्यरत असतांना तुम्ही तुमचे कर्तव्यात हलगर्जीपणा केला आहे. तुमच्या या प्रवृत्तीचा विपरीत परीणाम इतर पोलीस कर्मचा -यावर होवुन पोलीस खात्याचे शिस्तीस बाधा येण्याची शक्यता नाकारता येत नाही.करीता तुम्हाला या कार्यालयाचे कादानो जा.क्र.वाचक/कादानो/पोहेका ५९५/ २०२०/६८४ यवतमाळ दि.१६/४/२०२० रोजीच्या कारणे दाखवा नोटीस नुसार **' दोन वर्ष वेतनवाढ स्थगिती ' (अपरीणामकारक )** या प्रस्तावित शिक्षेबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. तुम्ही कारणे दाखवा नोटीस दि.२०/७/२०२० रोजी स्विकारुन सुध्दा अद्यापपावेतो स्पष्टीकरण सादर केले नाही. यावरुन तुम्ही वरीष्ठांच्या आदेशाची अवहेलना केल्याचे दिसुन येते.तरी त्याबाबत खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

**पोहेका / ५९५ भालचंद्र मांडवकर नेमणुक- पो.स्टे. मारेगाव** यांना त्यांचे वरील कसुरीबाबत मु.पो.शिक्षा व अपिल) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (५) अन्वये " **पुढील देय वार्षिक वेतनवाढ दोन (०२ ) वर्षाकरीता "(अपरीणामकारक)** रोखण्याची शिक्षा देण्यात येत आहे.

सदर अंतिम आदेशानुसार देण्यात आलेली शिक्षा तुम्हाला मान्य नसल्यास सदर शिक्षेबाबत तुम्ही विहीत मार्गाने आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन ६० दिवसांचे आंत पोलीस उपमहानिरीक्षक,अमरावती परीक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपील अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतित सादर करु शकता.

२३/१०/२०२०

**(डॉ. दिलीप पाटील - भुजबळ )**
**पोलीस अधीक्षक,यवतमाळ.**

**प्रति,**

**पोहेका / ५९५ भालचंद्र मांडवकर पो.स्टे. मारेगाव**
**मार्फत - उपविभागीय पोलीस अधिकारी ,वणी ( व्दिप्रतीत )**

२) सदर आदेशाची मूळ प्रति संबंधितांना अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकासह नावानिशी स्वाक्षरी घेवून दुय्यम प्रत या कार्यालयास उलट टपाली पाठवावी.

**प्रत** :- पो.कर्म.आस्था.लिपीक -९ /वेतन लिपीक -१/ आस्था लिपीक कक्ष - ९ (२)/डीपीजी लिपीक/पो.स्टे.मारेगाव यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस.

D PG

लोकनार्थ सादर क्रमांक.- पोअय/कक्ष-९(२)/मयत/पोहकॉ.६२६/ ४४०५ /२०२० यवतमाळ दि.

29 OCT 2020

## आदेश

पोहकॉ./६२६ खुशाल पांडुरंग आत्राम, पो.स्टे.वडकी यांचे दिनांक १६/१०/२०२० रोजी निधन झाल्याने त्यांचे नाव यवतमाळ जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरुन दिंनाक १६/१०/२०२० रोजी पासुन कमी करण्यात येत आहे.

२८/१०/२०२०

**(डॉ.दिलीप पाटील-भुजबळ)**
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

प्रति,

पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन वडकी.

प्रति लिपी-
प्रमुख लिपिक लेखा/प्रमुख लिपिक कर्मचारी आस्थापना शाखा/निवृत्ती वेतन लिपिक/ कार्यालय अधीक्षक/भ.नि.नि.लिपिक (३ प्रती)/वेतन लिपिक-१/वि.चौ.लिपिक/पलि-२,५,६/डीजीपी लिपिक यांना आवश्यक कार्यवाहीस्तव.

क्रमांक :पोअय/ वि.चौ./कक्ष १२(१)/अं.आ/ नापोका २२२५ / 8368 /२
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोडः ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 12 OCT 2020

# अंतीम आदेश

**संदर्भ -** का.दा.नो.क्र.डीपी/३१-बी २/नापोका २२२५ राठोड/कसुरी/६९५९ /२०२० यवतमाळ दि.२४/८/२०२०

**कसूरदाराचे नाव - नापोका /२२२५ सुरेश राठोड नेमणुक पो.मु.यवतमाळ**

**थोडक्यात कसूरी :-** पो.स्टे.अवधुतवाडी येथे अप. क्र.३६०/२०२० कलम ३२४,२९४,५०४,५०६ भा.द.वि.चा गुन्हा नोंद झाल्याप्रकरणी **तुम्ही खालील प्रमाणे कसुरी केली आहे.**

---oo---

**तुम्ही नापोका /२२२५ सुरेश राठोड नेमणुक पो.मु.यवतमाळ येथे कार्यरत असुन तुम्ही खालीलप्रमाणे प्राथमिक चौकशी मध्ये कसुरी केल्याचे दिसुन येते.**

----ooo---

तुम्ही पो.मु.यवतमाळ येथे कार्यरत असुन फिर्यादी सौ.वनिता राठोड यांनी दिलेल्या जबानी रिपोर्टवरुन तुमच्याविरुध्द दि.१९/४/२०२० रोजी पो.स्टे.अवधुतवाडी येथे अप. क्र.३६०/२०२० कलम ३२४,२९४,५०४,५०६ भा.द.वि.चा गुन्हा नोंद झालेलाअसुन फिर्यादीच्या रीपोर्ट वरुन यापुर्वीसुध्दा दि.१६/४/२०१९ रोजी तुमच्याविरुध्द N.C.३५०/२०१९ दि.५०४,५०६ भादवि प्रमाणे गुन्हा करण्यात आलेला आहे.

तुम्ही लोकसेवक असुन तुमची पत्नी फिर्यादी नामे सौ.वनिता राठोड यांना टिफीन भरण्यास उशीर का झाला या कारणावरुन वाद करुन स्टिलच्या टिफीन डब्याने डोक्यावर मारले.व पोलीस लाठीने डावे पायावर,उजव्या कानावर,उजव्या हातावर तसेच गालावर मारहाण करुन अश्लिल शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. तुमचे अशा प्रकारचे कृत्य कायद्याचे विरुध्द व नियमबाहय आहे.

अशा प्रकारे तुमचे हे कृत्य पोलीस खात्यास अशोभनिय आहे.व अत्यंत गंभीर स्वरुपाचे आहे.यावरुन तुम्ही गैरशिस्त वर्तनाचे, पोलीस खात्याची विश्वासर्हतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी,तसेच आक्षेपार्ह करीत असल्याचे निदर्शनास येते.त्यामुळे जनसामान्यामध्ये पोलीस दलाची बदनामी झाली.शिस्तबध्द अशा पोलीस खात्यात जबाबदार पदावर कार्यरत असतांना तुम्ही तुमचे कर्तव्यात नियमबाहय असे वर्तन केलेले आहे. तुमच्या या प्रवृत्तीचा विपरीत परीणाम इतर पोलीस कर्मचा -यावर होवुन पोलीस खात्याचे शिस्तीस बाधा येण्याची शक्यता नाकारता येत नाही.करीता तुम्हाला या कार्यालयाचे कादानो जा.क्र. डीपी/३१-बी २/नापोका २२२५ राठोड/कसुरी/६९५९ /२०२० यवतमाळ दि.२४/८/२०२० रोजीच्या कारणे दाखवा नोटीस नुसार **' एक वर्ष वेतनवाढ स्थगिती ' (अपरीणामकारक )** या प्रस्तावित शिक्षेबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. तुम्ही कारणे दाखवा नोटीस स्विकारुन खुलासा रा.पो.नि.

पो.मु.यवतमाळ यांचे मार्फतीने जा.क्र.१५५६ दि.३१/८/२०२० अन्वये कार्यालयास सादर केला आहे.सादर केलेल्या खुलाशाचे अवलोकन केले असता पुर्णतः समाधानकारक नाही. तरी ही एक संधी देवुन व शिक्षा कमी करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

**नापोका /२२२५ सुरेश राठोड नेमणुक पो.मु.यवतमाळ** यांना त्यांचे वरील कसुरीबाबत मु.पो.( शिक्षा व अपिल) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (४) अन्वये " **रु.२०००/-** " **आर्थिक दंड ही** शिक्षा देण्यात येत आहे.

सदर अंतिम आदेशानुसार देण्यात आलेली शिक्षा तुम्हाला मान्य नसल्यास सदर शिक्षेबाबत तुम्ही विहीत मार्गाने आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन ६० दिवसांचे आंत पोलीस उपमहानिरीक्षक,अमरावती परीक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपील अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतित सादर करु शकता.

14/10/2020

**(डॉ. दिलीप पाटील - भुजबळ )**
**पोलीस अधीक्षक,यवतमाळ.**

प्रति,

**नापोका /२२२५ सुरेश राठोड नेमणुक पो.मु.यवतमाळ**
मार्फत - **पोलीस उपअधिक्षक (मुख्या.),पो.मु.यवतमाळ ( व्दिप्रतीत )**

२) सदर आदेशाची मूळ प्रति संबंधितांना अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकासह नावानिशी स्वाक्षरी घेवून दुय्यम प्रत या कार्यालयास उलट टपाली पाठवावी.

प्रत :- पो.कर्म.आस्था.लिपीक -९ /वेतन लिपीक -१/ आस्था लिपीक कक्ष - ९ (५)/डीपीजी लिपीक / रा.पो.नि.पो.मु.यवतमाळ / प्र.अ.पो.स्टे.अवधुतवाडी यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस.

क्रमांक :पोअय/कक्ष - ०९/असीबी/पो.कर्म.हजर/ ८३०७ /२०२०
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड: ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : - 8 OCT 2020

संदर्भ :- पोलीस उप-अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ यांचे पत्र जा.क्र. अँकब्यु.यवत/कार्यमुक्त/१४६४/२०२० दि. २३/०९/२०२०

विषय :- आस्थापनेवर हजर करुन घेणेबाबत.

----oo------

**आदेश**

पोलीस उप-अधीक्षक , लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ यांचे पत्र जा.क्र. अँकब्यु.यवत/कार्यमुक्त/१४६४/२०२० दि. २३/०९/२०२० अन्वये लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ यांचे आस्थापनेवरील खालील नमुद पोलीस कर्मचारी हे या आस्थापनेवर दि. ०१/१०/२०२० रोजी हजर झाले आहेत.

नमुद पोलीस कर्मचारी यांना या घटकात हजर करुन घेण्यात आले असुन त्यांना या जिल्हयाचा रिक्त बक्कल नंबर खालीलप्रमाणे देण्यात येऊन त्यांची नेमणूक, दर्शविलेल्या ठिकाणी करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस कर्मचारी यांचे नाव, पदनाम व बक्कल नंबर | देण्यात आलेला बक्कल नंबर | नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| ०१ | पोहवा/ शेषराव सोयाम | १२९९ | पोलीस मुख्यालय, यवतमाळ |
| ०२ | पोना/भारत चिरडे | १३३७ | पोलीस मुख्यालय, यवतमाळ |

०८/१०/२०

( डॉ. दिलीप पाटील - भुजबळ)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ

प्रति,
वर नमुद संबंधीत पोलीस कर्मचारी
मार्फत - राखीव पोलीस निरीक्षक, पो. मुख्या. यवतमाळ/ पो. नियंत्रण कक्ष यवतमाळ
प्रत - वेतन लिपीक - १/आस्थापना कक्ष - ९(३)/ राजपत्रे लिपीक/भ.नि.नि. लिपीक/वस्त्र भांडारपाल, यांना माहिती व आवश्यक कारवाईसाठी.

प्रत माहितीस - पोलीस उपअधिक्षक, (मुख्या.) यवतमाळ

प्रत अग्रेषित - पोलीस उप-अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ
२/- नमुद पोलीस कर्मचारी यांचे सेवापट परिपुर्ण नोंदीसह या कार्यालयास पाठविण्यात यावे.

८३४६

क्र:पोअय/कार्यालय अधीक्षक/अपोअ-कामकाज/ /२०२०
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोडः ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : - 9 OCT 2020

## आदेश

**विषय :-मंत्रालयीन कर्मचारी यांचेकडून पोलीस अधीक्षक यांचेकडे सादर होणा-या कार्यालयीन कामकाजाशी संबंधित नस्ती हया अपर पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचेमार्फतीने सादर करणेबाबत.**
**संदर्भ :- आदेश क्र:पाअय/कक्ष-१०/पोउअधी-मुख्या-यवतमाळ/कार्यमुक्त/८३०४/२०२०, दि.०८/१०/२०२०**

****

उपरोक्त विषयान्वये, पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ येथील पत्रव्यवहार शाखा, प्रबंधक शाखा, लेखा शाखा, आस्थापना शाखा व विभागीय चौकशी शाखा या शाखेत कार्यरत असलेले मंत्रालयीन लिपिकवर्गीय कर्मचारी यांचेकडून कार्यालयीन कामकाजाशी संबंधित नस्ती हया पोलीस अधीक्षक यांचेकडे सादर करण्यात येतात. सदर नस्ती हया सध्या प्रमुख लिपिक, कार्यालय अधीक्षक व पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय) यांचे मार्फतीने पोलीस अधीक्षक यांचेकडे सादर करण्यात येतात.

सद्यःस्थितीत पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), यवतमाळ हे पद रिक्त असल्याने उपरोक्त नमूद संदर्भान्वये सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार श्रीमती माधुरी बावीस्कर, उपविभागीय पोलीस अधिकारी, यवतमाळ उपविभाग यांचेकडे देण्यात आलेला आहे. तथापी त्यांना उपविभागीय पोलीस अधिकारी, यवतमाळ उपविभाग या कार्यकारी पदाची मूळ जबाबदारी पार पाडणे सुलभ व्हावे म्हणून पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ येथील पत्रव्यवहार शाखा, प्रबंधक शाखा, लेखा शाखा, आस्थापना शाखा व विभागीय चौकशी शाखा या शाखेत कक्षाप्रमाणे कार्यरत मंत्रालयीन लिपिकवर्गीय कर्मचारी यांचेकडून कार्यालयीन कामकाजाशी संबंधित सर्व नस्ती हया पोलीस अधीक्षक यांचेकडे सादर करतांना प्रमुख लिपिक, कार्यालय अधीक्षक व त्यानंतर अपर पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचेमार्फतीने पोलीस अधीक्षक यांचेकडे सादर करण्यात याव्यात.

सर्व संबंधितांनी याची नोंद घेऊन उचित कार्यवाही करावी.

०८/१०/२०

**( डॉ.दिलीप पाटील-भुजबळ)**
**पोलीस अधीक्षक, यवतमाळ.**

**प्रति,**

कार्यालय अधीक्षक/प्रमुख लिपिक-पत्रव्यवहार शाखा/आस्थापना शाखा/लेखा शाखा/प्रबंधक शाखा/विभागीय चौकशी शाखा, यवतमाळ.

**प्रत-अपर पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांना माहितीकरिता सस्नेह अग्रेषित.**

**प्रतीलीपी :-**पोउपअधी(मुख्या)/कक्ष-१४-राजपत्र लिपिक /स्विय सहायक यांना माहिती व उचित कार्यवाहीकरिता.

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

8772
क्रमांक :पोअय/कक्ष १२ (१) /पोहवा २६२९ राजेश/ /२०२०
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड: ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 28 OCT 2020

## अंतिम आदेश

**संदर्भ** - तशा/मेल अर्ज/संजय पलये/पोहवा २६२९ राजेश/६७५०/२०२० यवतमाळ दि.१८/८/२०२०

**कसुरदाराचे नाव** - पोका/२६२९ राजेश जाधव नेमणुक - पो.स्टे.उमरखेड

**थोडक्यात कसुरी -**

तुम्ही वाहतुक शिपाई पोका/२६२९ राजेश जाधव नेमणुक पो.स्टे.उमरखेड तुमची डयुटी दि.२३/६/२०२० रोजी महागाव रोडवर लागली असता तुम्ही इस्तेगाशा क्र.१७२७/२०२० कलम ५०(अ) /१७७ प्रमाणे कायदेशिर कार्यवाही केली.परंतु कर्तव्यादरम्यान वाहनधारक इकबाल अहेमद नजीर अहेमद यांच्या वाहनाचे वाहन चालान करुन चालानवर घेतलेल्या दंडाची रक्कम न टाकता कोरी जी.एन.पावती वाहन धारकास दिली.त्यामुळे तक्रारदार श्री.संजय पलये (पळसकर) रा.उमरखेड जि.यवतमाळ यांस वरीष्ठांना तक्रार करण्यास वाव मिळाला आहे. ,असे केलेल्या चौकशी अहवालावरुन दिसुन येते.

प्रकरणी कर्तव्यातील कसुरीबाबत आपणांस मु.पो.(शिक्षा आणि अपिले ) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (२) अन्वये " **सक्त ताकीद** " देण्यात येत आहे. तसेच अशा प्रकारची पुनरावृती पुन्हा होणार नाही.याची दक्षता घ्यावी.

28/10/2020
(डॉ. दिलीप पाटील - भुजबळ )
पोलीस अधीक्षक,यवतमाळ

प्रति,
पोका/२६२९ राजेश जाधव पो.स्टे.उमरखेड
मार्फत - प्रभारी अधिकारी, पो.स्टे.उमरखेड

२/- उपरोक्त नोटीसची मूळ प्रत संबंधीतास अदा करुन <u>दुय्यम प्रतिवर त्यांची दिनांकासह स्वाक्षरी</u> घेवुन ती दुय्यम प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी.

प्रत- डीपीजी लिपीक /आस्थापना लिपीक/सआली - ५ /प्र. अ.तक्रार शाखा, यवतमाळ यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

क्र. पोअय/डीपी/३१बी/अं.आ./ सपोनि-योगेश इंगळे+४/ 8740/२०२०
पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे कार्यालय, एल.आय.सी. चौक यवतमाळ
दुरध्वनि क्रमांक:-०७२३२-२५६७०० फॅक्स क्रमांक:-०७२३२-२५६७१०
ई मेल आय डी :- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 26 OCT 2020

---

## अंतिम आदेश

**वाचा :-** डीपी/३१-बी-२/सपोनि- योगेश इंगळे +४/कसुरी/४६६१/२०२०, यवतमाळ दिनांक . १५/०६/२०२०

**कसुरदार :-** १) स.पो.नि./ योगेश इंगळे २) सफौ/८६० राजु भगत ३) नापोशि/१७०५ नितीन कडुकार ४) पोशि/७९४ देवा जाधव ५) पोशि/२५७१ राजु कूकडे सर्व नेमणुक पो.स्टे.नेर

**कसुरी**

आपण १) स.पो.नि./ योगेश इंगळे २) सफौ/८६० राजु भगत ३) नापोशि/१७०५ नितीन कडुकार ४) पोशि/७९४ देवा जाधव ५) पोशि/२५७१ राजु कूकडे पो.स्टे.नेर येथे नेमणुकीस आहात. आपणास उप.वि.पो.अ. यांनी वारंवार अवैद्य धंद्यावर आळा घालण्यासाठी पो.स्टे नेर हद्दीतील संपुर्ण अवैद्य धंदे यांचेवर प्रभावीपणे कार्यवाही करुन संपुर्ण अवैद्य धंदे बंद करणे बाबत सुचना दिल्या असता तसेच त्याबाबत पत्र व्यवहार करुन सुध्दा आपण उप.वि.पो.अ.यांचे आदेशाचे पालन न करता हेतुपुरस्पर अवैद्य धंदे करणा-यांना अभय देवुन आपल्या आर्थिक फायद्यासाठी अवैद्य धंदे पुर्ववत सुरूच ठेवले.

दि. ११/०३/२०२० रोजी उप.वि.पो.अ.यांना मिळालेल्या माहिती प्रमाणे उप.वि.पो.अ.यांचे विशेष पथक कर्मचारी यांना रवाना करुन पो.स्टे.नेर शहरातील पोस्ट ऑफीस जवळ अवैद्य धंद्यावर छापाटकुन रेड कार्यवाही करुन मक्का जुगार रु.७,९५०/- खेळतांना १) समाधान वसंतराव मिसळे वय-३५, २) अलीम सिंकदर मिर्झा वय.२३, ३) करण चिंतामण मेश्राम वय २४ वर्ष रा.नेर हे मिळुन आल्याने त्यांचे विरुध्द पो.स्टे.नेर अप नंबर ११६/२०२० कलम १२ अ जुगार कायदा अन्वये कार्यवाही करण्यात आली.

आपणास उप.वि.पो.अ.यांनी वेळोवेळी गुन्हे बैठकीत तसेच मोबाईल फोनवरुन व लेखी आदेश दुवुन सुध्दा आपण उप.वि.पो.अ.यांचे आदेशाकडे हेतुपूरस्पर दुर्लक्ष करुन स्वत:चे आर्थीक फायद्या करीता अवैद्य धंदे चालविणा-यांना अभय दिल्याचे दिसुन येते. तसेच उप.वि.पो.अ.यांनी दिलेल्या आदेशाकडे १) स.पो.नि/ योगेश इंगळे २) राजु भगत ३) नापोशि/१७०५ नितीन कडुकार ४) पोशि/७९४ देवा जाधव ५) पोशि-२५७१ राजु कुकडे आपण जाणीवपुर्वक दुर्लक्ष केल्याचे दिसुन येत आहे.

प्रकरणी कर्तव्यातील हलगर्जीपणा व बेजबाबदारपणाचे कसुरीबाबत आपणास क्र.डीपी/३१-बी-२/स.पो.नि.योगेश इंगळे+४/कसुरी/४६६१/२०२० दिनांक १५/०६/२०२० नुसार **"१ (एक) वर्षे वेतनवाढ स्थगिती" (अपरिणामकारक)** या प्रस्तावित शिक्षेची कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे. आपण प्रस्तावित शिक्षेबाबतची का.दा.नो स्विकारुन त्यावर आपण स्पष्टिकरण सादर केले आपले स्पष्टीकरण हे समाधानकारक नसल्याने का.दा.नो. मधील प्रस्तावित शिक्षा कायम ठेवुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

# आदेश

मी पोलीस अधिक्षक यवतमाळ याव्दारे, १) स.पो.नि./ येगेश इंगळे २) सफौ/८६० राजु भगत ३) नापोशि/१७०५ नितीन कडुकार ४) पोशि/७९४ देवानंद जाधव ५) पोशि/२५७१ राजु कूकडे सर्व नेमणुक पो.स्टेनेर यांना त्यांचे उपरोक्त कसुरीबाबत मुंबई पोलीस नियम (शिक्षा आणी अपिले)१९५६ मधील तरतुदीनुसार **" पुढील देय वार्षीक वेतनवाढ १ (एक) वर्ष स्थगिती " (अपरिणामकारक)** ची शिक्षा देत आहे.

आपण सदर शिक्षेने व्यथीत होत असतील तर सदर आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन ६० दिवसांचे आंत पोलीस उप महानिरीक्षक, अमरावती परीक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपील अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतित सादर करु शकता.

11/10/22

**(डॉ.दिलीप पाटील-भुजबळ)**
**पोलीस अधिक्षक, यवतमाळ**

**प्रति,**

१) स.पो.नि./ योगेश इंगळे २) सफौ/८६० राजु भगत ३) नापोशि/१७०५ नितीन कडुकार
४) पोशि/७९४ देवा जाधव ५) पोशि/२५७१ राजु कूकडे **सर्व नेमणुक पो.स्टे.नेर**

**मार्फतः-** प्रभारी अधिकारी पो.स्टे.नेर

२/ उपरोक्त अंतीम आदेशाच्या दोन प्रती पाठविण्यात येत आहे १ प्रत सबंधीतास अदा करुन दुय्यम प्रतिवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन दुय्यम प्रत या कार्यालयास सादर करावी.

**पत :-** आस्थापना लिपीक अधि-कर्म/वेतन लीपीक अधि-कर्म/ आस्था-२,४,५ / डिपीजी लीपीक यांना माहीती व अवश्यक कार्यवाहीस.

डि पी जी ली 487-14